www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर


मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : २१५ वा रविवार दि. २० एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## मुंबई-पुणे एक्सप्रेस वे, समृद्धी महामार्गावर इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई** : मुंबईतील सर्व टोल नाक्यांवरून छोट्या वाहनांना टोलमुक्ती मिळाल्यानंतर आता मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावरून धावणाऱ्या सर्व इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी मिळणार आहे. त्यामुळे महामार्गावरून इलेक्ट्रिक वाहनांचा प्रवास सुसाट होणार आहे.एक मे 2025 पासून या निर्णयाची अंमलबजावणी होण्याची शक्यता असून सरकारकडून 'महाराष्ट्र दिनाची' भेट ठरणार आहे. मात्र, या निर्णयामुळे सरकारच्या तिजोरीवर 100 कोटींचा भार पडणार आहे.पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी राज्य सरकारने सर्व सरकारी वाहने इलेक्ट्रिक करण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यानुसार डिझेल, पेट्रोल गाड्यांची जागा इलेक्ट्रिक वाहने घेणार आहेत. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी एक व्यापक इलेक्ट्रिक वाहन



धोरण महायुती सरकार राबवत आहे. यामध्ये 'ईव्ही'चा वापर वाढविण्यासाठी प्रोत्साहने, पायाभूत सुविधा विकास आणि नियामक उपाययोजनांचा समावेश आहे.देशभरात इलेक्ट्रिक वाहनांच्या विक्रीने गती घेतली असली तरीही एकूण वाहन विक्रीपैकी फक्त 6-7 टक्के इलेक्ट्रिक वाहने आहेत. त्यामध्ये देखील दिल्ली (12 टक्के), कर्नाटक (9-10 टक्के) आणि तामिळनाडू (8 टक्के) यासारख्या राज्यांनी प्रागतिक धोरणे व पायाभूत सुविधांच्या विकासाच्या माध्यमातून इलेक्ट्रिक वाहनांच्या अधिक प्रमाणावरील स्वीकारार्हतेला चालना दिली आहे. सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्यात एकूण वाहन विक्री पैकी फक्त 5 ते 6 टक्के इलेक्ट्रिक वाहने आहेत.महायुती सरकारने 2025 पर्यंत प्रमुख शहरांमध्ये नवीन नोंदणीकृत वाहनांपैकी 10 टक्के वाहने इलेक्ट्रिक असावीत, असे लक्ष्य ठेवून सुधारित 'ईव्ही' धोरण आणत आहे. राज्यात सद्य:स्थितीत 1 जानेवारी 2025 पर्यंत 4 कोटी 88 लाख वाहने असून त्यापैकी 6 लाख 44 हजार 779 वाहने ही इलेक्ट्रिकवर धावणारी आहेत.'ईव्ही' गाड्यांना टोलमाफी देण्याच्या प्रस्तावामुळे सरकारच्या तिजोरीवर 100 कोटींचा भार पडणार आहे. त्यामुळे या प्रस्तावाला वित्त विभागाने विरोध केला तरी 'ईव्ही' गाड्यांच्या उत्पादनाला चालना मिळावी आणि अधिकाधिक पर्यावरणपूरक गाड्यांचा जास्तीत जास्त वापर वाढावा यासाठी हा भार परिवहन विभाग पेलणार आहे, असेही समजते.'ईव्ही'चा वापर वाढविण्यासाठी महामार्गावर चारचाकी, बसेस व ट्रकसाठी उच्च दाबाच्या चार्जिंगची सुविधा असणारे स्टेशन 25 कि.मी. अंतरावर असणार आहे.

दरम्यान, राज्यात उभारण्यात येणाऱ्या एकूण चार्जिंग स्टेशनपैकी 10 टक्के स्टेशन ही यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग आणि हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर उभारली जातील; तर उर्वरित स्टेशन राज्याच्या इतर भागात व राष्ट्रीय महामार्गावर प्राधान्याने उभारण्यात येणार आहेत.



## जिंतीच्या कुस्ती मैदानात पहिल्या नंबरच्या कुस्तीत पैलवान राहुल सुळ गुणांवर विजयी



**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर** : जिंती ता.कराड येथे दरवर्षी कुस्ती मैदान भरवले जाते.यावर्षी पण अगदी खेळीमेळीच्या वातावरण पार पडले. गावातील ग्रामस्थांच्या देणगीतून कुस्ती मैदान पार पडते. श्री ज्योतिर्लिंग देवाच्या मंदिरापासून सर्व पैलवान व ग्रामस्थ श्री हनुमानाची मूर्ती घेऊन मैदानात पोहोचले.

मैदानात गावातील जेष्ठ पैलवानांच्या हस्ते उद्घाटन करून सुरवात केली.प्रथमतः छोट्या पैलवणाच्या कुस्त्या झाल्या.या कुस्ती मैदानात विशेषतः महिला कुस्ती, छोट्या कुस्त्या चुणूकदार पाहायला मिळाल्या. दुसऱ्या क्रमांक ओमकार मदने तर तिसऱ्या क्रमांकावर अक्षय चौगुले विजयी झाले. तसेच महिलांमध्ये स्वरा बाकले विजयी झाली. गरीब घराण्यातील पैलवान रसवंती चालवत असताना हात सापडला.अर्धवट असलेला पैलवान सुध्दा कुस्ती करू शकतो हे जिंतीच्या कुस्ती मैदानात दिसले.

त्या पैलवानाने यांनी जिद्द न सोडता कुस्ती चालूच ठेवली. समोरच्या पैलवानाला चितपट केले.प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात त्या पैलवनाचे टाळ्यांच्या वर्षावाने कुस्ती मैदान दणाणून निघाले.कुस्ती मैदानात अनेक कुस्त्या चुणूकदार झाल्या.

गावातील पैलवनांनी आपल्या मातृभूमीत कुस्त्याची चुणूक दाखवून सर्व पैलवान विजयी झाले. पैलवान अविराज चव्हाण , राजेंद्र नलवडे यांनी चुणूकदार कुस्त्या केल्या. पैलवान ग्रुप जिंती यांनी १ महिन्यापासून कुस्त्यांसाठी मेहनत घेतली.

अजूनही जिंतीमध्ये तालमीचा प्रश्न ऐरणीवर आहे तो सुटला की अजून जिंतीत तयार होतील असा ग्रामस्थांचा सूर निघत आहे. कुस्ती मैदानासाठी अनेक कुस्ती शौकीन व मान्यवर उपस्थित होते. जिंती गावच्या आजूबाजूच्या सर्व गावांमध्ये कुस्ती मैदानाचे कौतुक होत आहे.

## निखिल बबन पगारे याणे मंथन प्रज्ञाशोल परीक्षेत राज्यस्तरीय पाचवा क्रमांक पटकवला

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी** : आष्टी तालुक्यातील पंडित जव्हारलाल नेहरू महाविद्यालय विद्यालयातील आष्टी येथील विद्यार्थी निखिल बबन पगारे याचा मंथन प्रज्ञाशोल परीक्षेत राज्यस्तरीय पाचवा क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.निखिलचा मंथन च्या परीक्षेत राज्यस्तरीय पाचवा क्रमांक आल्याबद्दल, आष्टी तालुक्यातून व पंडित नेहरू महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंदांकडून, व वाहिरा पंचकृषीतून घवघवीत यश मिळाल्याबद्दल निखिल ते कौतुक केले जात आहे,



## श्री. नांदाई माता मुर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा जल्लोषात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**उलवे:वार्ताहर** : श्री नांदाई माता मुर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहळा निमित्ताने कलशरोहण व नूतन मंदिराचे उद्घाटन चैत्र/वैशाख शके १९४७ शनिवार दि. १८/०४/२०२५ रोजी परमपूज्य गणेशनाथजी बाबा यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

सदर देवीचे मंदिर सिडको चारगाव पुनर्वसन समिती, पाचगाव ग्रामस्थ आणि राजेंद्र व विजय शांताबाई नामदेव शिरढोणकर बंधू यांच्या संकल्पनेतुंन परमपूज्य गोरक्षनाथ मठाधिपती त्र्यंबकेश्वर बालयोगी गणेश नाथजी बाबा यांच्या हस्ते होम ,हवन करून मोठया भक्तीभाव वातावरणात संपन्न झाले.



यावेळी शेकडो भाविकांनी व मान्यवरांनी ग्रामस्थ व सेवेकरी वर्गाने पूजा,अर्चना करून प्रसाद वाटप केले. यावेळी आलेल्या सर्व भक्त जनांचे मंदिर विश्वस्त तसेच शिरढोणकर परिवाराने स्वागत,सन्मान केले.

## बीड जिल्ह्यात मुख्यमंत्र्यांच्या हेलिपॅड साठी झाडांची कत्तल निषेधार्ह :- डॉ.गणेश ढवळे



**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : संपूर्ण मराठवाड्यात बीड जिल्ह्यात २.४ ईतके कमी वनक्षेत्र असुन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित आहे. वनक्षेत्र आणि हरित क्षेत्र वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत "झाडे लावा आणि झाडे जगवा" अशी मोठ्या प्रमाणावर जाहिरात बाजी करण्यात येते. मात्र दिनांक १९ एप्रिल २०२५ शनिवार रोजी शिरूर कासार तालुक्यातील घाटशिळ पारगाव येथे वैराग्यमुर्ती संत वामनभाऊ महाराज यांच्या ९३ वा नारळी सप्ताह सांगता निमित्ताने समारोप प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे हेलिकॉप्टरने आगमन झाले. या वेळी हेलिपॅड तयार करण्यासाठी १५-२० वर्षांपूर्वीची लहान मोठी अशी १६ झाडांची कत्तल करण्यात आली. या बद्दल वृक्षप्रेमी आणि पर्यावरण प्रेमीमध्ये संतापाची लाट उसळली असुन "झाडे लावा, झाडे जगवा" असा लाखों रूपयांच्या जाहिरातीद्वारे संदेश देणाऱ्या सरकारला हेलिपॅडची जागा बदलुन झाडे वाचवता आली नसती का..? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला असुन एरवी वृक्षतोडीसाठी सर्वसामान्य माणसाला दंडाची भाषा करणारे सरकार, लोकप्रतिनिधींसाठी वेगळे नियम आणि कायदे आहेत का?? या वृक्षतोडीसाठी वनविभागाकडून रितसर परवानगी घेण्यात आली होती का?? असा सवाल करत संबंधित प्रकरणात चौकशी करून झाडे तोडणाऱ्या जबाबदार अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

## कर्जत-खालापूर श्री २०२५" चे आयोजन

### प्रीतम म्हात्रे यांची उपस्थिती





**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोशिएशन संल्गन रायगड बॉडी बिल्डर्स अँड फिटनेस असोशिएशन यांच्या मान्यतेने खोपोली शहर बॉडी बिल्डर्स असोशिएशन यांच्या सहयोगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने दिपक ब्रदर्स आयोजित "कर्जत-खालापूर श्री २०२५" चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुंबई श्री, महाराष्ट्र श्री, मिस्टर इंडिया मिस्टर ऑलम्पिया आकर्षण समीर दाभिलकर आणि जगातला सर्वात कमी उंचीचा बॉडीबिल्डर व गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नाव कोरणारा प्रतिक मोहिते उपस्थित होते.

यावेळी शेकाप नेते प्रीतम जे एम म्हात्रे उपस्थित होते.५० किलो, ५५ किलो, ६० किलो, ६५ किलो, ७० किलो वरील अशाप्रकारे पाच वजनी गट सामन्यांचे उत्कृष्टपणे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धकांसाठी आकर्षक चषक व प्रमाणपत्र, बेस्ट पोझर साठी रोख रक्कम, आकर्षक चषक व प्रमाणपत्र देण्यात आले.

यावेळी शेकाप नेते प्रीतम जे एम म्हात्रे यांनी उपस्थित राहून स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

*********************



## शिवस्फूर्ती प्रगती मंडळ(गोविंदा पथक) तर्फे श्री साईनाथ महोत्सव २०२५ चे आयोजन

शिवस्फूर्ती प्रगती मंडळ
अमृतनगर, घाटकोपर(प)

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर । केतन भोज** : श्री साईनाथ मंदिर,रामनगर(अ),घाटकोपर(प),मुंबई-८६ येथील नावाजलेले शिवस्फूर्ती प्रगती मंडळ(गोविंदा पथक) तर्फे दरवर्षी प्रमाणे यंदा ही श्री साईनाथ महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी मंगळवार दि.२९ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ७.०० वाजता साई भजन सोहळा आयोजित करण्यात आला असून,दुसऱ्या दिवशी बुधवार दि.३० एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता भव्य साईपालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.आणि शेवटी गुरुवार दि.०१ मे २०२५ रोजी सकाळी ७.०० वाजता साई अभिषेक केला जाणार असून तद्नंतर दुपारी २.३० वाजता श्री सत्यनारायणाची महापुजा आयोजित केली आहे.तसेच नंतर सायंकाळी ७.०० वाजता महाप्रसाद(साई भंडारा) होणार आहे.आणि शेवटी रात्री ८.३० वाजता प्रमुख अतिथी देणगीदारांचा जाहिर सत्कार सोहळा पार पडणार आहे.अशा प्रकारे तीन दिवसीय कार्यक्रम होणार आहे.तरी या भव्य श्री साईनाथ महोत्सवामध्ये सर्व साई भक्तांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष-हरेश धांद्रुत,सचिव-अजित गायकवाड,खजिनदार-शिवकुमार मल्होत्रा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# उरणच्या बाजारपेठेत पालघर जिल्ह्यांतील ताडगोळ्याची आवक वाढली

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी । प्रदीप पाटील** : जेएनपीटी निर्मित वाढवण बंदरामुळे उरण तालुक्यात प्रसिद्धीस आलेल्या पालघर जिल्ह्यांतील ताडगोळे व्यवसायिकांनी आता ताडगोळे विक्रीसाठी आपला मोर्चा थेट उरण तालुक्यात गाठला असून मोक्याच्या रहदारीच्या जागांवर थेट आपले ताडगोळाविक्री केंद्र प्रस्थापित केले आहे.पालघरमधून पहाटे टेम्पो भरून ताडगोळ्याची फळे आणली जातात आणि ग्राहकांना त्यांच्या समोर ताडफळा मधून ताडगोळे काढून देण्यात येत असल्याने खरेदीसाठी नागरिक मोठया संख्येनेगर्दी करताना दिसतात, ग्राहक हे ताडगोळे 125 ते 150 रुपये डझन भावाने खरेदी करतात.उरण-नागाव मधील ताडगोळ्या पेक्षा भाव कमी असल्यानेआणि नजरे समोर ताडगोळे ताडफळा मधून काढून देत असल्याने त्याची विक्री मोठया प्रमाणात होत आहे.

सध्या वाढलेल्या उन्हाच्या तडाख्यापासून सुटका होण्यासाठी नागरिकांकडून विविध उपाय करीत आहेत. थंडगार लस्सी, शीतपेय, नीरा, शहाळ्याचे पाणी, उसाचा रस घेण्याकडे नागरिकांचा कल वाढत असल्याचे दिसून येत आहे. थंडगार असलेल्या ताडगोळ्यांची आवक उरणमध्ये मोठ्या प्रमाणात येऊ लागल्याने हे ताडगोळे घेण्यासाठी नागरिकांची बाजारपेठेत गर्दी होताना दिसते. उरणमध्ये विशेषतः नागाव,चाणजे परिसरात ताडगोळ्यांची झाडे मोठ्या प्रमाणात असून उन्हाळी हंगामात हे फळ मोठ्या प्रमाणात मिळते. नागवांतील बहुसंख्य घरांतून ताडगोळे झाडावरून काढून नंतर त्यांची बाजारपेठेत विक्री करणे हा आपला पारंपारिक व्यवसाय नव्या पिढीनेही कायम सुरु ठेवला आहे. पिरवाडी,नागाव व चाणजे परिसरातून दैनदिन सुमारे100 ते 150 डझन ताडगोळे उरण बाजारपेठेत विक्रीसाठी उपलब्ध असतात.

ताडगोळे चवीला गोड असून प्रकृतील थंड असतात त्यामुळे ते उन्हाळ्यात खाल्यास त्याचा शारीरिकदृष्ट्या आरोग्यासाठी फायदा होतो.ताडगोळयामध्ये खनिज लोह, पोटॅशियम, फॉस्फरस,आणि व्हीटॅमीन ए,बी,सी,ही जीवनसत्व मोठया प्रमाणात आढळत असल्या मुळे ताडगोळ्याचे फळ हे शरीरासाठी उपयुक्त आहे.कारणहे फळ आपल्या शरीरांतील पाण्याची पातळी योग्य राखण्याचे काम करते,त्याच बरोबरीने शरीराचे तपमान ही नियंत्रित ठेवते.म्हणून उन्हाळ्याच्या दिवसात प्रत्येकाने हे फळ



आर्जवून खावे.उरण बाजारपेठेत गरमीच्या हंगामात ताडगोळ्यांची विक्री सर्वाधिक होत असून विक्री करणाऱ्याकडून सध्या हेच ताडगोळे चढ्या रुपये दराने विकले जातात. ताडगोळ्याच्या फळामध्ये एका फळात सर्वसाधारण दोन किंवा तीन ताडगोळे असतात. अख्या ताडगोळ्यास बाजारात चांगली किंमत मिळते. त्यामुळे ताडफळ तोडून त्यातील अखंड गोळे काढणे हे कठीण काम असते. परंतु पिडीजात हा व्यवसाय काही कुटुंबे करत असतात त्याचप्रमाणे काही कुटुंबे उंच तडाच्या झाडावरून ताडगोळे उतरविण्याचे काम व त्यातून अखंड ताडगोळा काढण्याचे काम करण्याचा व्यवसाय करतात.उरण नागाव हे सिडकोच्या हद्दीत असूनही या ठिकाणी ओ.एन.जी.सी. प्रकल्प पलीकडे अन्य कोणताही प्रकल्प आलेला नाही.कारण या ठिकाणी तत्कालीन जी.प.अध्यक्ष कै. रमेश डाउर यांच्या विनंतीमुळे सिडकोच्या अधिकार्यांनी नागाव येथे भेट देऊन पाहणी केली. यावेळी येथील शेती, भाजीचे मळे आणि विशेषतः तडा माडाची झाडे पाहून नागाव गावातील परिसर हरितपट्टा म्हणून घोषित केला. मात्र यावेळी उपस्थित अधिकारी नागाव मधील ताडगोळ्यांची चव घेण्यास विसरले नाहीत. आज पालघर जिल्ह्यामधून ताडगोळा फळाची आवक मोठया प्रमाणात होत असली तरीही आज नागाव मध्ये होणारे ताडगोळयाचे उत्पादन केवळ उरण पुरते मर्यादित न रहाता मुंबई, ठाणे, पनवेल, नवी मुंबई परिसराबरोबरच आता हेच ताडगोळे घाटमाथ्यापर्यंत पोहोचले आहेत.

उरण नागाव हे सिडकोच्या हद्दीत असूनही या ठिकाणी ओ.एन.जी.सी. प्रकल्प पलीकडे अन्य कोणताही प्रकल्प आलेला नाही.कारण या ठिकाणी तत्कालीन जी.प.अध्यक्ष कै. रमेश डाउर यांच्या विनंतीमुळे सिडकोच्या अधिकार्यांनी नागाव येथे भेट देऊन पाहणी केली. यावेळी येथील शेती, भाजीचे मळे आणि विशेषतः तडा माडाची झाडे पाहून नागाव गावातील परिसर हरितपट्टा म्हणून घोषित केला.

मात्र यावेळी उपस्थित अधिकारी नागाव मधील ताडगोळ्यांची चव घेण्यास विसरले नाहीत. यामुळेच आजही नागाव मध्ये होणारे ताडगोळयाचे उत्पादन केवळ उरण पुरते मर्यादित न रहाता मुंबई, ठाणे, पनवेल, नवी मुंबई परिसरबरोबरच आता हेच ताडगोळे घाटमाथ्यापर्यंत पोहोचले आहेत.

## बारवर कारवाई, सात जणांविरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल शहर पोलिसांनी मरीआई ग्रिट्स बारवर कारवाई करत सात जणांविरोधात गुन्हा दाखल केला. यात चार महिला, एक मॅनेजर आणि दोन पुरुष स्वेटर यांचा समावेश आहे.16 एप्रिल रोजी पनवेल ओएनजीसी जवळील मरीआई ग्रिट्स बारमध्ये महिला वेटर अश्लील हावभाव करत असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पनवेल पोलिसांनी त्या ठिकाणी धाड टाकली. यावेळी महिला वेटर या अश्लील हावभाव, भिभत्स वर्तन, अंगविक्षेप तसेच हातवारे करून नृत्य करून ग्राहकांसोबत अश्लील चाळे करत होत्या. यावेळी त्यांना पुरुष वेटर प्रोत्साहन देताना दिसून आले. या प्रकरणी पोलिसांनी बार मॅनेजर, महिला वेटर, पुरुष वेटर यांच्यावर १७ एप्रिल रोजी गुन्हा दाखल केला. तीन ते चार महिन्यातील या बारवर ही दुसरी कारवाई आहे. त्यामुळे या बारचा परवाना कायमची रद्द करण्याची मागणी केली जात आहे."

बारमध्ये नियमांचे उल्लंघन हे ठरलेलेच आहे. थोड्याफार कारवाया होत असल्या तरी देखील बिनदिक्कतपणे बार सुरूच आहेत. पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील ग्रिट्स बार अँड रेस्टॉरंटवर डिसेंबर-जानेवारी महिन्यात गुन्हे शाखा कक्ष 1 वाशीने कारवाई करत तब्बल 51 जणांवर गुन्हा दाखल केला होता. पनवेलमध्ये सुरू असलेल्या लेडीज बारमध्ये काम करणाऱ्या महिलांकडे नोकरनामे नसताना देखील महिला काम करत असल्याचे समोर आले आहे. पोलिसांकडून बारची तपासणी होत असल्याचे वारंवार सांगण्यात येते मात्र असे जर होत असेल तर नोकरनामे नसताना देखील महिला कशा काय काम करू शकतात हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. अनेक बार मालकांनी हे बार भाड्याने दिलेले आहेत. बारमालक भाडे वसूल करण्यासाठी कोणत्याही थराला जात आहेत. बार मध्ये वेश्या व्यवसायाला प्रोत्साहन दिले जात आहे.

लेडीज सर्व्हिस बारमधून वेश्याव्यवसायास चालना मिळत आहे. पनवेल आणि नवी मुंबईत आजही लेडीज सर्व्हिस बारच्या नावावर चालणारे काही बार रात्री दीड ते दोन वाजता बंद होतात. लेडीज सर्व्हिस बारमधील वेटर्सला देण्यात येणारे नोकरनामे बहाल करण्याचा अधिकार उत्पादन शुल्क विभागाकडे आहे.
नोकरनाम्याच्या अधिक पटीने महिलांना कामावर ठेवले जात आहे. पोलिसांकडून अनेकदा डान्सबारवर कारवाई केली जाते. यात केवळ मॅनेजर व वेटरवर गुन्हे दाखल करून बार मालकांना पाठीशी घातले जाते. अनेक ठिकाणी बारमध्ये अल्पवयीन मुली देखील काम करत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पनवेलच्या सर्वच बारमध्ये अशाप्रकारे नियमांचे उल्लंघन केले जात आहे.

## मधु तारा प्रमुख यांची नात सिया हिचा वाढदिवस अनाथालयात मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी । संतोष लांडे** : मधु तारा दिव्यांग सेवा सोशल फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य संपूर्ण महाराष्ट्रात आरोग्य दिव्यांग निराधार रोजगार या सर्वच विषयावर राज्यभर कार्य करते.हीच सामाजिक बांधिलकी जपत मधु तारा प्रमुख श्री नितीनजी शिंदे आणि त्यांच्या परिवाराने दिनांक 18 एप्रिल 2025 रोजी सिया रोहित कर्णे हिचा दुसरा वाढदिवस हडपसर पुणे येथील मधु तारा सोबती श्री मिलिंदजी सरवदे यांच्या वात्सल्य अनाथालय येथे मोठ्या उत्साहात साजरा केला.तसेच हडपसर पुणे येथील दत्त मंदिरात श्री स्वामी समर्थांची सियाच्या हसते मूर्ती भेट देऊन साजरा करण्यात आला. या वेळी राज्यभरातून आलेले अनाथ एक पालकत्व असलेल्या निवासी मुले मुली




यांचा सांभाळ करून शिक्षण दिले जाते अशा मुलांसोबत सियाने केक कापून खाऊ वाटप करून आपला दुसरा वाढदिवस साजरा केला. या प्रसंगी मधु तारा प्रमुखांचे जावई पुणे पोलिस क्राइम श्री रोहितजी मारूती कर्णे आणि कन्या सौ.धरती रोहित कर्णे शिंदे.

सियाची आजी यांनी असा वाढदिवस साजरा करणे हे खरोखर अविस्मरणीय आनंदाचा क्षण आहे असे म्हणत सामाजिक बांधिलकी जपली.या वेळी श्री मिलिंद सरवदे यांनी मधु तारा प्रमुख नेहमीच सोबत असल्याने खूप आधार मिळतो असे म्हटले.या वेळी सियाच्या वाढदिवसानिमित हडपसर पुणे येथील दत्त मंदिरात सियाच्या हसते श्री स्वामी समर्थांची मूर्ती भेट देण्यात आली.

## खारघरमध्ये रंगणार भाजप सांस्कृतिक महोत्सव

**महोत्सवात मनोरंजन, इतिहास, कला तसेच महाराष्ट्राच्या विविध भागातील मिसळ महोत्सवाचा संगम**

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)** : महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून भाजप सांस्कृतिक महोत्सव १ ते ४ मेदरम्यान खारघर सेक्टर १२ येथील गावदेवी मैदानावर रंगणार आहे. या महोत्सवात मनोरंजन, इतिहास, कला तसेच महाराष्ट्राच्या विविध भागातील मिसळ महोत्सवाचा संगम पहायला मिळणार आहे.खारघर भाजप आयोजित या महोत्सवात १ मे रोजी सायंकाळी ६ वाजता ९० कलाकारांच्या संचासह महाराष्ट्राची महासंस्कृती कार्यक्रम होईल. यात आपल्या राज्याच्या विविध सांस्कृतिक परंपरा आणि शिवराज्याभिषेक सोहळ्याचे भव्य सादरीकरण होणार आहे. २ मे रोजी सायंकाळी ६ वाजता खारघर आणि पनवेल परिसरातील विविध संस्थांचा सांस्कृतिक कलाविष्कार, ३ मे सायंकाळी ६ वाजता सुप्रसिद्ध गायिका मुग्धा वैशंपायन आणि गायक प्रथमेश लघाटे यांच्या सुमधुर गाण्यांची मैफल होईल. या वेळी निवेदक म्हणून विघ्नेश जोशी उपस्थित असतील. या महोत्सवात चारही दिवस सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत महाराष्ट्राच्या विविध भागांतील चविष्ट मिसळचे स्टॉल्स असणारा मिसळ महोत्सव तसेच ऐतिहासिक शस्त्रांचे भव्य प्रदर्शन भरवण्यात येणार आहे.

## दारूबंदीची ज्वाला पेटली महिलाचे थेट रक्ताच्या सह्या देऊन अनसिंग पोलीस स्टेशनला निवेदन

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी**
**वाशिम । गजानन पवार** : वाशिम जिल्ह्यातील अनसिंग पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सोनगव्हाण तालुका वाई कृष्णा आणि पांगरखेडा, या गावांमध्ये अवैध दारू विक्रीने थैमान घातले आहे. त्यामुळे त्रस्त झालेल्या गावातील महिलांनी आता थेट संघर्षाची वाट धरली आहे. वजरदेवी महिला विकास संघाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या नेतृत्व कर्त्या कु. आरती संतोष ठोके. यांच्या मार्गदर्शनाखाली अनसिंग पोलीस स्टेशनवर धडक दिली विशेष म्हणजे या महिलांनी आपल्या रक्तातून निवेदन सादर करून पोलीस प्रशासनाला हादरवून सोडले. गावामध्ये सुरू असलेल्या बेकायदेशीर दारू विक्रीमुळे महिलांच्या आयुष्य संकटात आले आहे. पुरुषाचे व्यसन मुलाच्या शिक्षणातील अडथळे आणि गावातील आर्थिक असुरक्षा यामुळे संतप्त महिलांनी रस्त्यावर उतरून जोरदार आंदोलने केली. दारू बंद झाली पाहिजे नाहीतर आम्ही शांत बसणार नाही. असा ठाम इशारा या महिलांनी दिला. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की यापूर्वी अनसिंग पोलीस स्टेशनला निवेदन दिले होते. परंतु त्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे दारू विक्री त्याचे धाडस वाढले आहे. या आंदोलनामुळे प्रशासनाची झोप उडाली असून महिलांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार तात्काळ कारवाई झाली नाही. तर भविष्यात मोठ्या आंदोलनाला सामोरे जावे लागेल. गावातील सामाजिक व आर्थिक आरोग्य, टिकवण्यासाठी वज्र देवी महिला संघटनाचा लढा आता निर्णय टप्प्यावर पोहोचला आहे.




## अवघ्या 24 तासात रिक्षा चोरट्यास पनवेल शहर पोलिसांनी घेतले ताब्यात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल । वार्ताहर** : पनवेल शहर परिसरातून रिक्षा चोरी करणाऱ्या चोरट्यास अवघ्या 24 तासात पनवेल शहर पोलिसांनी रिक्षासह ताब्यात घेतले आहे.

स्वप्नील पवार यांनी त्यांची रिक्षा क्र.एमएच-46-बीडी-0834 ही दर्ग्यासमोरील शाळेजवळ उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर रिक्षा चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली होती.

या तक्रारीनंतर वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप. नि.विनोद लभडे, पोहवा नितीन वाघमारे, अविनाश गंथडे, अमोल डोईफोडे, परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, पोना विनोद देशमुख, पोशि चंद्रशेखर चौधरी आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे सदर रिक्षाचा शोध घेत असताना ही रिक्षा कर्नाळा स्पोर्टस् ॲकॅडमी परिसरात उभी असल्याचे समजले.

त्यानुसार या पथकाने तेथे जावून सापळा रचून आरोपी मुस्तकीन खान (32 रा.पनवेल) याला ताब्यात घेतले आहे. याबाबत अधिक तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

## अमरावती विमानतळाला वीर शिरोमणी महाराणा प्रताप सिंह जी नाव देण्यात यावे

### राजपूत समाजाच्या वतीने मागणी -लखनसिंह ठाकुर

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर** : बहुचर्चित अमरावती विमानतळाला वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजी यांचे नाव देण्याबाबत रिसोड तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते लखनसिह ठाकूर यांनी समाजाच्या वतीने केंद्रीय मंत्री राजनाथ सिंग यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

सकल राजपूत समाज व उत्तर भारतीय राजपूत समाज तथा अखिल भारतीय राजपूत समाजाच्या वतीने हि मागणीकरण्यात आली आहे.

अखंड भारतातील राजपूत समाजाच्या सामाजिक भावना लक्षात घेता विदर्भाला महाराष्ट्राच्या आर्थिक राजधानी मुंबई सोबत जोडण्याकरिता जी विमान सेवा सुरू करण्यात आली. त्यामुळे विदर्भातील समस्त जनतेमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

राजपूत समाच्या वतीने या निवेदनाद्वारे अभिनंदन करीत आहे.. करिता वीर शिरोमणी राणा प्रतापजी यांचे नाव या विमानतळाला देऊन एक ऐतिहासिक शौर्याचा वारसा जपण्याचे कार्य आपल्या हातून व्हावे ही विनंती सकल राजपूत समाजाच्या वतीने लखनसिंह ठाकुर यांनी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य तो सकारात्मक निर्णय घ्याल अशी रास्त मागणी समाजाच्या वतीने करण्यात आली.



## निधन वार्ता

### शांताबाई गोंधळी यांचे निधन



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल तालुक्यातील जावळे येथील शांताबाई रघुनाथ गोंधळी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते चिंतामण गोंधळी यांच्या त्या आई होत.त्यांचा दशक्रिया विधी 26 एप्रिल रोजी श्री क्षेत्र नाशिक येथे होणार असून उत्तरकार्य 29 एप्रिल रोजी राहत्या घरी जावळे येथे होणार आहे. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सून, नातू, नात असा मोठा परिवार आहे.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# नवीन पनवेलमध्ये 18 तास वीजपुरवठा खंडित: गॅस कंपनीच्या खोदकामाचा नागरिकांना फटका

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)** : नवीन पनवेलमधील सेक्टर 16 मध्ये पिल्लई कॉलेजजवळ महानगर गॅस कंपनीच्या सुरू असलेल्या खोदकामामुळे महावितरणच्या भूमिगत केबलवर मार लागला आणि परिणामी संपूर्ण परिसराचा वीजपुरवठा तब्बल 18 तासांसाठी खंडित झाला. शुक्रवार, 18 एप्रिल रोजी दुपारी 3 वाजता अचानक वीज गेल्यानंतर शनिवार, 19 एप्रिल रोजी सकाळी 9 वाजेपर्यंत सेक्टर 15, 15 ए आणि 16 मधील नागरिक अंधारात राहिले.वाढत्या तापमानामुळे आधीच त्रस्त असलेल्या नागरिकांना या अनपेक्षित वीज खंडित झाल्यामुळे अधिकच मनस्ताप सहन करावा लागला. तापमान 38 अंशांपेक्षा अधिक असताना पंखे, एसी बंद पडल्याने घरातच गरम हवा साचली होती. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि रुग्ण यांच्यासाठी ही परिस्थिती अधिक त्रासदायक ठरली. महानगर गॅस कंपनीकडून शहरात वेगवेगळ्या भागांमध्ये पाइपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. मात्र, या कामामध्ये सुरक्षेचे आणि समन्वयाचे भान हरवले गेले असल्याचे वारंवार दिसून येते. याआधीही अशाच प्रकारे पिण्याच्या पाण्याच्या लाईन फोडल्या गेल्याच्या घटना घडल्या आहेत आणि आता थेट वीजपुरवठ्यावरच घाला आला आहे. यावेळी तेथील स्थानिक मा.नगरसेवक जयवंत महामुनी यांनी सुद्धा संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता महावितरणच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी तातडीने धाव घेऊन रात्री उशिरापर्यंत दुरुस्तीचे काम सुरू ठेवले. अखेर शनिवार सकाळी 9 वाजता विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला. तथापी, नागरिकांनी महावितरण आणि महानगर गॅस कंपनी दोघांनाही निष्काळजीपणाबाबत जाब विचारला आहे. रोज काही ना काही खोदकाम चालू असते. रस्त्यांचीही अवस्था खराब झाली आहे. आता पाणी आणि वीजसुद्धा गेली, तर आम्ही राहायचं तरी कसं? असा सवाल सेक्टर 16 मधील रहिवासी सीमा पटेल यांनी उपस्थित केला. तर सेक्टर 15ए मधील मधुकर नाईक म्हणाले, काहीतरी समन्वय असायला हवा ना? गॅस कंपनी आणि महावितरण यांच्यात समजूतदारपणा हवा. नागरिकांनी त्रास सहन करायचा का?शहरात सुरू असलेली खोदकामं अनेकदा ना महावितरणशी समन्वय साधून केली जातात, ना नगरसेवक किंवा स्थानिक प्राधिकरणाशी. त्यामुळे या त्रुटी पुन्हा पुन्हा घडत आहेत. गॅस कंपनीने महावितरणला खोदकामाबाबत आगाऊ माहिती दिली होती का? त्यावर महावितरणने कोणती दक्षता घेतली? याचे उत्तर अजून मिळालेले नाही. उन्हाळ्याच्या कडाक्यात एकीकडे पाण्याची टंचाई आणि दुसरीकडे वीजपुरवठ्याची अनिश्चितता - या दोन्ही संकटांमुळे नवीन पनवेलमधील रहिवासी अक्षरशः हैराण झाले आहेत. महापालिका, महावितरण आणि महानगर गॅस कंपनी यांच्यातील समन्वयाचा अभाव आणि नियोजनातील त्रुटी यामुळे नागरिकांचे हाल दिवसेंदिवस वाढत आहेत. तत्कालीन उपाययोजना करण्याबरोबरच भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत, यासाठी स्थानिक प्रशासनाने ठोस आणि दूरगामी निर्णय घेणे अत्यावश्यक झाले आहे. अन्यथा स्मार्ट सिटीच्या गोंडस घोषणांचा फोलपणा अशा घटनांमुळे वारंवार उघड होईल.



## आर्यन योगेश्वर वांढेकर याणे मंथन प्रज्ञाशोल परीक्षेत राज्यस्तरीय सहावा क्रमांक पटकवला

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी** : आष्टी तालुक्यातील वसुंधरा प्राथमिक विद्यालयातील आष्टी येथील आर्यन योगेश्वर वांढेकर याचा मंथन प्रज्ञाशोल परीक्षेत राज्यस्तरीय सहावा तर बीड जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.आर्यन चा मंथन च्या परीक्षेत राज्यस्तरीय सहावा तर बीड जिल्ह्यात प्रथम आल्याबद्दल, आष्टी तालुक्यातून व वसुंधरा प्राथमिक विद्यालयातून सर्व शिक्षक वृंदांकडून, घवघवीत यश मिळाल्याबद्दल आर्यनचे कौतुक केले जात आहे, तसेच विशेष आभार मार्गदर्शक शिक्षक आकाश कांबळे सर वसुंधरा प्राथमिक विद्यालयाचे संचालक माननीय श्री मनोज धस सर यांचे खूप खूप आभार



## दिग्दर्शक मनिष शिंदे ८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर त्यांच्या पहिल्या चित्रपटाला लवकरच सुरुवात करणार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी**
**किशोर रमाकांत गुडेकर । मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : मराठी चित्रपटसृष्टीत एक संवेदनशील आणि विचारशील दिग्दर्शक म्हणून ओळख निर्माण करणारे मनिष शिंदे आता त्यांच्या पहिल्या चित्रपटाच्या दिग्दर्शनाला सुरुवात करत आहेत. गेल्या ८ वर्षांत विविध प्रकल्पांमध्ये अनुभव घेऊन, त्यांनी आता एका ठोस आणि वैचारिकदृष्ट्या समृद्ध अशा विषयावर आधारित चित्रपट साकारण्याचा निर्णय घेतला आहे. हा चित्रपट एक कलात्मक आणि आशयप्रधान निर्मिती असून, त्याच्या माध्यमातून प्रेक्षकांना एक भावनिक अनुभव मिळेल, असा विश्वास मनिष शिंदे यांनी व्यक्त केला आहे."हा केवळ माझा पहिला चित्रपट नाही, तर गेल्या अनेक वर्षांचा शोध, संघर्ष आणि सर्जनशीलतेचा परिणाम आहे. प्रेक्षकांपर्यंत काहीतरी खरं, खोलवर भिडणारं पोहोचवायचं आहे," असं ते म्हणाले.चित्रपटाच्या कथाविषयाबाबत सध्या अधिक माहिती दिली जात नाही. मात्र हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार यांसारख्या प्रतिष्ठित व्यासपीठांवर नेण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न सुरू आहेत. चित्रपटाचं चित्रीकरण लवकरच सुरू होणार असून, संपूर्ण टीम सध्या पूर्वतयारीमध्ये व्यस्त आहे.



## बोगस डॉक्टरांच्या हाती ग्रामीण जनतेची नाडी

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर । रिसोड** : तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक दिवसांपासून बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट वाढला आहे. कायदेशीर वैद्यकीय पदवी नसताना असाध्य रोगांवर उपचार करण्याचा दावा करीत सदरील बोगस डॉक्टर रुग्णांच्या जीवाशी खेळत आहेत. या बोगस डॉक्टरांची जाळे तालुका भर विस्तारलेले असताना याकडे आरोग्य विभागाचे पूर्णतः दुर्लक्ष दिसून येत आहे. त्यावरून बोगस डॉक्टरांचे आरोग्य विभागाशी अर्थपूर्ण संबंध तर नाही ना? असा प्रश्न निर्माण होत आहे.

कमी भावात मेडिकल स्टोअर्स वरून औषधी घेणे व चढ्या दराने रुग्णांच्या माथी मारून अवाच्या सव्वा पैसे उकळले जात आहे. या बोगस डॉक्टरांना औषध ची कोणत्या निकषावर औषधी देतात हा गंभीर प्रश्न असून केवळ पैसा उकळण्याच्या व्यवसायात मात्र रुग्णाच्या जीवनाशी खेळ खेळला जात आहे.



ग्रामीण भागात बोगस डॉक्टरांची एन्ट्री होताच भोळी भाबडी जनता या डॉक्टरांकडे उपचारासाठी जात आहेत. सध्या सकाळी थंडी व दुपारी तापमान अशा वातावरण बदलामुळे सर्दी खोकला ताप यासह इतर आजार दिसू लागले आहेत. ग्रामीण नागरिक शहराच्या ठिकाणी उपचार घेण्याऐवजी गावात फेरीवर येणाऱ्या या डॉक्टरांकडून उपचार करून घेत आहेत. परंतु या बोगस डॉक्टरकडे कोणत्याच प्रकारची पदवी किंवा उपचाराचे विधिवत प्रशिक्षण नसतानाही ते बेधडकपणे सलाईन आणि इंजेक्शन चा वापर करून रुग्णांच्या जीविताशी आहेत. खेळत रिसोड तालुक्यातील बहुतांश गावात बोगस डॉक्टरांची जाळे पसरले आहेत. या डॉक्टरांनी आपापली गावे निश्चित करीत गावाची वाटणी करून घेतली असल्याची माहिती आहे. रोज सकाळी गावात जाणे रुग्णांचा शोध घेणे आणि त्यावर रुग्णांना स्वतः जवळचे इंजेक्शन व औषधी देत मोठ्या प्रमाणात पैसे उकळण्याचा धंदा बिनधास्त सुरू आहे.

या प्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन कारवाई करण्याची गरज आहे. अशी खेड्यापाड्यातील चर्चा आहे.

## रिसोड पोलीसांची मागील एक महिन्यातील विशेष कामगिरी मा. पोलीस अधीक्षक, वाशिम यांचेहस्ते सत्कार

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर** : रिसोड पोलीसांनी मागील एक ते दिड महिन्यात अपहरण, मिसींग, बलात्कार व पोक्सो यासारख्या गंभीर गुन्हयांची उकल करून गुन्हयातील पिडीतेस न्याय देवून आरोपींना अटक करून कायदेशिर कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच मोटार सायकल, मोबाईल चोरींच्या गुन्ह्यातील अज्ञात आरोपींचा शोध घेवून चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

या प्रकरणाची मा. पोलीस अधीक्षक, वाशिम यांनी दखल घेवून दिनांक १७/०४/२०२५ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम येथे जिल्हयातील सर्व ठाणेदार यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन रिसोड येथील अधिकारी व अंमलदारांचा प्रशस्तीपत्र देवून सत्कार केला आहे.



मा. पोलीस अधीक्षक श्री. अनुज तारे (IPS) व मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड याचे हस्ते विशेष कामगिरी करणारे मा. सहायक पोलीस अधीक्षक, वाशिम श्री. नवदिप अग्रवाल (IPS), पोलीस निरीक्षक श्री. रामेश्वर चव्हाण, सहा. पोलीस निरीक्षक शिवचरण डोंगरे, पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर नागरे, पोलीस हवालदार रतन बावस्कर, मंगेश मालवे, पोलीस अंमलदार रवि अढागळे, विनोद घनवट, परमेश्वर भोणे, प्रविण ढवणे, हेमंत सरकटे, विश्वास चव्हाण, रूपेश मस्के, साहेबराव मुकाडे यांचा प्रशस्तीपत्र देवून सत्कार केला आहे.

## कवी सरकार इंगळी यांची शिर्डी येथे काव्यगंध कवी संमेलनात लक्षवेधी उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**हातकणंगले वार्ताहर** : शिर्डीतील साहित्य रसिकांसाठी एक मोठा काव्यमय सोहळा आयोजित करण्यात आला असून, 'काव्यगंध साहित्य मंच' यांच्या वतीने २ रे राज्यस्तरीय कविसंमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळा दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी शांतीकमल हॉटेल हॉल, नगर-मनमाड रोड, भक्त निवास शेजारी, शिर्डी येथे पार पडणार आहे.या कार्यक्रमाची प्रमुख संकल्पना 'नवोदित कवी लेखक यांना व्यासपीठ मिळणे हि अशी असून, या भव्य सोहळ्याचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ कवी श्री. भारत सातपुते (लातूर) भूषवणार आहेत.

कार्यक्रमात राज्यभरातील नामवंत साहित्यिक, कवी व अभ्यासकांची उपस्थिती लाभणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध गझलकार रज्जाक शेख (श्रीरामपूर), कवी प्रा. अमोल चिने (नाशिक) आणि प्रा. नवनाथ शिंदे (अहिल्यानगर) हे आपल्या साहित्यिक विचारांनी रंगत वाढवणार आहेत.लक्षवेधी उपस्थितीमध्ये मा. वैभव धर्माधिकारी (पुणे), कवी सरकार इंगळी, हातकणंगले (कोल्हापूर) आणि ज्येष्ठ कवयित्री सुमन ताई मुठे (नाशिक) यांचा समावेश आहे. कार्यक्रमात राज्यभरातून सुमारे ७५ हून अधिक कवी व कवयित्री सहभागी होणार असून, त्यांची बहारदार कवितांची मैफिल रसिकांसाठी पर्वणी ठरणार आहे.

विविध सामाजिक, भावनिक, सर्जनशील विषयांवर आधारित कविता सादर केल्या जाणार आहेत.कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून मा. जयराम पारधी (ठाणे), प्रा. गणपत तरंगे (पुणे), कवयित्री भावना गांधीले (अ.नगर), सुरेखा जोगदे आणि डॉ. धनंजय जगताप (शिर्डी) हे उपस्थित राहणार आहेत.सकाळी ९:३० वाजता सुरू होणारा हा कार्यक्रम सायंकाळी ७:०० वाजेपर्यंत विविध सत्रांत आयोजित करण्यात आला आहे. साहित्यप्रेमी, कवी, अभ्यासक आणि रसिकांसाठी ही एक सुंदर साहित्यिक पर्वणी ठरणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी 'काव्यगंध आयोजन समिती' सज्ज झाली आहे.संस्थेचे संस्थापक अँड. अक्षशिला शिंदे (नागपूर) व प्रशांत गोरे (अहिल्यानगर) यांच्या प्रमुख नियोजना खाली शिर्डीतील साहित्यविश्वात हा कार्यक्रम एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असून, महाराष्टाच्या कानाकोपऱ्यातून अनेक नवोदित व प्रसिद्ध कवींना एक मुक्त व्यासपीठ संधी मिळणार आहे.



# कर्जत अल्पवयीन मुलींवर अत्याचार प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडी आक्रमक

**दैनिक युवक आधार**
**कर्जत वार्ताहर** : कर्जत येथे दोन दिवसांपूर्वी उघडकीस आलेल्या शाळेच्या बसमधील अल्पवयीन मुलींवरील झालेल्या लैंगिक शोषणाच्या धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील आरोपी करण पाटील (रा. वदप) याच्यावर कायद्यानुसार कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, आणि पीडित मुलींना तात्काळ न्याय मिळावा, अशी मागणी आज कर्जत-खालापूर विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला आघाडीच्या वतीने करण्यात आली.

या मागणीसाठी महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी शनिवारी (दि.१९) रोजी कर्जत पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांची भेट घेऊन त्यांना लेखी निवेदन सादर केले. या घटनेतील आरोपीवर फास्ट ट्रॅक कोर्टात खटला दाखल करून तातडीने न्याय प्रक्रिया राबवण्यात यावी, अशी स्पष्ट भूमिका यावेळी मांडण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कर्जत खालापूरचे उभरते नेतृत्व,कर्जत खालापूर कराचा खऱ्या अर्थाने आधार सन्मानीय सुधाकर भाऊ घारे यांच्या नेतृत्वा खाली निवेदन देण्यात आले यावेळी महिला आघाडीच्या कर्जत खालापूर विधानसभा महिला अध्यक्षा सुरेखाताई खेडकर, विधानसभा महिला अध्यक्षा पूजाताई सुर्वे, कर्जत तालुका महिला अध्यक्षा रंजनाताई धुळे, कर्जत शहर महिला अध्यक्षा मधुराताई चंदन, कर्जत शहर महिला कार्याध्यक्षा मनीषाताई ठोंबरे, माजी नगरसेविका सुवर्णाताई निलधे, कर्जत तालुका राष्ट्रवादी युवती काँग्रेस अध्यक्षा सुचिताताई लोहकरे, नेरळ शहर महिला कार्याध्यक्षा मनीषाताई पाटील, कर्जत तालुका महिला सरचिटणीस विमालताई देशमुख, कर्जत शहर कार्याध्यक्षा मनिषाताई देशमुख, खोपोली शहर महिला कार्याध्यक्षा शोभाताई काटे, खालापूर तालुका महिला उपाध्यक्षा साक्षी घोसाळकर, कर्जत तालुका महिला उपाध्यक्षा वंदना थोरवे, महिला कार्यकारिणी सदस्या दिप्तीताई देशमुख, महिला कार्यकारिणी सदस्या नारायणीताई केदारी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्त्या उपस्थित होत्या.यावेळी महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत आरोपीवर तातडीने व कठोर कारवाई करण्याची मागणी केली.




महिलांच्या सुरक्षेसाठी शासन व प्रशासनाने ठोस भूमिका घेतली पाहिजे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# पनवेल महानगरपालिकेची धडाकेबाज कारवाई

## 3 हजार 500 किलो प्लास्टिक जप्त,25 हजार दंड वसूल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** प्लास्टिक बंदी मोहिमेअंतर्गत पनवेल महानगरपालिकेने दिनांक १७एप्रिल रोजी धडाकेबाज कारवाई करत 3 हजार 500 किलो प्लास्टिक पिशव्या जप्त केल्या असून 25 हजार रुपयांचा दंडही वसूल केला आहे.

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या नियंत्रणात पनवेलच्या सर्व विभागात ही मोहीम राबविली.पनवेल महानगरपालिका हद्दीत चारही प्रभाग समिती निहाय प्लास्टिक बंदी कारवाई करण्यात आली यामध्ये कामोठे प्रभाग समितीमध्ये प्लास्टिक जप्ती कारवाईवेळी प्रभाग क कामोठेमध्ये सुमारे 300 किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. यामध्ये प्लास्टिक चमचे, ग्लास, वाट्या, प्लेट यांचा साठा जप्त करण्यात आला. तसेच यावेळी एकूण दहा हजार दंड जमा करण्यात आला.



**नावडे उपविभाग**

प्लास्टिक बंदी कारवाई दरम्यान नावडे उपविभागात प्लास्टिक साठा करणाऱ्या गोडाऊनवर कारवाई करून सुमारे 1 हजार 850 किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.

**खारघर प्रभाग समिती अ**

तसेच खारघर प्रभाग समिती अ मध्ये प्लास्टिक विरोधी कारवाई दरम्यान प्लास्टिक 250 किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. यावेळी एकूण 5 हजार दंड वसूल करण्यात आला.

**कळंबोली प्रभाग समिती ब**

याबरोबरच कळंबोली प्रभाग समिती ब मध्ये प्लास्टिक विरोधी कारवाई दरम्यान450 किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. यावेळी एकुण पाच हजार दंड जमा करण्यात आला.

**पनवेल प्रभाग समिती ड**

तसेच पनवेल प्रभाग समिती ड मध्ये प्लास्टिक विरोधी कारवाई दरम्यान 650 किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले तसेच एकूण पाच हजार दंड जमा करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर न करता कागदी अथवा कापडी पिशव्यांचा वापर करून पनवेल महानगरपालिका प्लास्टिक मुक्त करण्याच्या दृष्टीने महापालिकेस मदत करावी, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

**एकूण जप्त साठा**

जप्त प्लास्टिक 3 हजार 500किलो

**एकूण 25 हजार दंड जमा**

एकल प्लास्टिकचा वापर मार्च 2018 पासून प्रतिबंधित आहेत. यामध्ये सर्व प्रकारच्या प्लास्टिकच्या पिशव्या (कॅरी बॅग्स) - हॅडल असलेल्या व नसलेल्या कंपोस्टेबल व प्लास्टिक ( कचरा व नर्सरीसाठीच्या पिशव्या सोडून) सर्व प्रकारच्या नॉन ओव्हन पॉलीप्रोपीलीन बॅग्स ६० ग्रॅम पर स्क्वेअर मीटर (जीएसएम) पेक्षा कमी जाडीच्या पिशव्या यावरती बंदी आहे.

1) प्लास्टिकच्या कांडयासह कानकोरणी, फुग्यांसाठी प्लॉस्टिकच्या कांडया, प्लास्टिकचे झेंडे, कॅडी, कांडया, आईस्क्रीम कांडया. सजावटीसाठी प्लास्टिक व पॉलिस्टीरीन (थर्माकोल ) यावरती बंदी करण्यातझआली आहे.

2) दुकानदारांनी कंपोस्टेबल पदार्थापासून बनविण्यात आलेले एकल वापर वस्तु उदा. स्ट्रॉ, ताट, कप्स, प्लेटस, ग्लासेस, काटे, चमचे, भांडे, वाडगा, कन्टेनर इ. तथापि, कंपोस्टेबल पदार्थापासून प्लास्टीक पासून बनविलेल्या अशा वस्तू कंपोस्टेबल असल्याबाबत सेंट्रल इन्स्टीट्यूट ऑफ प्लास्टीक इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी (CIPET) व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्रमाणित करून घेणे बंधनकारक राहील.

## सामाजिक समतेचा संदेश देणारे संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती म्हणजे प्रेरणादिन - प्रा. संजय मोरे.अण्णा

**दैनिक युवक आधार**

**किशोर रमाकांत गुडेकर I मुंबई विभाग प्रमुख** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 व्या जयंतीचे आयोजन सुनोदा येथील जयभिम मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी पाटील प्रमुख पाहुणे संजय पाटील तर विशेष अतिथी प्रवक्ता मार्गदर्शक म्हणुन प्रा संजय मोरे अँटी करप्शन मानव अधिकार सर्व शक्ती सेना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष तथा भाजपा अनुजाती मोर्चा राज्य सचिव हे होते. तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीला छत्रपती शिवाजी महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला शिवाजी नाना पाटील संजय पाटील प्रा. संजय मोरे सरपंच बळीराम वानखेडे यांनी सामुहिकरित्या पुष्पहार अर्पण केला. मिरवणुकीच्या रथावरील आरुढ तथागत गौतम बुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्तीचे प्रा. संजय मोरे सरपंच बळीराम वानखेडे स्वप्नीक प्रथम बुद्ध वंदना घेऊन मेणबत्ती लावुन पुष्पहार अर्पण करून पुजन केले. त्या प्रसंगी प्रा. संजय मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले कि,सामाजिक समतेचा संदेश देणारे संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती म्हणजे प्रेरणादिन ! आपल्या कृतीतुन विचारातुन सामाजिक परिवर्तन घडविणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे विचार सदैव मार्गदर्शक राहतील. भारताचे संविधान हे जगातील सर्वात मोठे संविधान असुन संविधान धर्मनिरपेक्ष असुन कोणत्याही विशिष्ट धर्माला प्राधान्य दिले जात नाही. असे प्रा. संजय मोरे यांनी सांगीतले. त्या प्रसंगी डॉ. धनराज बावस्कर शिवाजी नाना पाटील संजय पाटील पपु पाटील सरपंच बळीराम वानखेडे राजेंद्र सपकाळे मालतीबाई वानखेडे दिपक वानखेडे मनीषा वानखेडे अक्षय वानखडे जिवंन वानखेडे कु. दिक्षा वानखेडे चि. अश्वदीप वानखेडे गोलु वानखेडे अमोल वानखेडे सुपडू वानखेडे जितेंद्र वानखेडे समाधान वानखेडे संजय वानखेडे आकाश वानखेडे फकिरा गाढे वानखेडे सुनीता तायडे अलका तायडे वसलाबाई वानखेडे स्वप्ना वानखेडे वैशाली वानखेडे उज्वला सपकाळे आशाबाई सावळे यमुना सावळे निर्मलाबाई वानखेडे गोपीचंद वानखेडे प्रमोद तायडे विजय सपकाळे अजय सपकाळे पंडीत वानखेडे जितेंद्र वानखेडे बाळु वानखेडे यांच्या सह असंख्य कार्यकर्ते उपासक उपासिका सह गावातील असंख्य लोक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. धनराज बावस्कर यांनी केले तर आभार जिवंत वानखेडे यांनी मानले.





## एका रक्तदानामागची हाकः शेतकऱ्यांचे बळी,पाण्यासाठी बुडालेली बालिका आणि सरकारच्या अनास्थेचा रक्तरंजित निषेध



**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी I जितेंद्र खोडे** : राज्यात नापिकी,कर्जबाजारीपणा आणि प्रशासनाच्या बेपरवाईमुळे शेतकरी,सामान्य नागरिक आणि अगदी चिमुकलीही मृत्यूला कवटाळत आहेत.गेल्या २४ तासांत आत्महत्येच्या सत्राने पुन्हा थैमान घातले असून,घाटंजी तालुक्यातील मानोली येथे दोन शेतकऱ्यांनी गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली.दत्तात्रय लक्ष्मण सोनुले (६४) व दत्ता उर्फ अनंता गोपाळ जंगठे (५७) अशी त्यांची नावे असून,बँकेच्या थकबाकीच्या तगाद्यामुळे त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे समजते.याच दिवशी वणी तालुक्यात पुरड व चिखलगाव येथेही दोन आत्महत्यांचे प्रकार समोर आले.पायल बालाजी उरकुटे (२५) या तरुणीने आणि संभा बापुराव निकोडे (५५) या व्यक्तीने गळफास लावून आत्महत्या केली.तर दुसरीकडे,परभणी जिल्ह्यात माळसोन्ना येथे सचिन बालाजी जाधव,त्यांची ७ महिन्यांची गर्भवती पत्नी ज्योत्स्ना व भगवान टेकाडे यांनीही नापिकी व कर्जाच्या विळख्यात येऊन आपले प्राण गमावले.या सगळ्या दुर्दैवी घटनांना पुरक ठरत आहे प्रशासनाची ढिसाळ व्यवस्था आर्णी तालुक्यातील १२ वर्षीय वेदिका सुरेश चव्हाण हिला 'हर घर जल' योजनेच्या अपयशाचा जीवाला मुकावे लागले.रविवारी ती नदीवर पाणी भरायला गेली असता बुडून मृत्युमुखी पडली.गावकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण असून,शासनाच्या अनास्थेचा निषेध सुरु आहे.या सर्व घटनेच्या पार्श्वभूमीवर, आज दिनांक १९ एप्रिल(शनिवार) रोजी वसंतराव नाईक जिल्हा शासकीय रुग्णालयातील रक्तपेढीत प्रा.पंढरी पाठे यांनी सरकारला थेट इशारा देत रक्तदान केले.“आज रक्त दिलंय,उद्या सरकारच्या बेफिकिरीमुळे रक्त सांडण्याची वेळ आमच्यावर येऊ नये,” असे म्हणत त्यांनी शासनाच्या निष्काळजी धोरणावर जोरदार हल्ला चढवला. या वेळी किशोर चव्हाण,प्रफुल्ल देशमुख,कॉम्रेड सचिन मनवर,कृष्णा पुसनाके,दीपक यंगड,विनोद पत्रे,विद्या परचाके,मंगला सोयाम,बजरंग बायस्कर,अनिकेत नेवारे,परशुराम कडू आदी नागरिक उपस्थित होते.

## तळोजा येथील कारवाईत 20 लाख 76 हजार रुपये किंमतीचा गांजा जप्त



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** नांदेड येथून तळोजा येथे गांजा विक्रीसाठी आलेल्या त्रिकुटापैकी एका तरुणाला तळोजा पोलिसांनी अटक केली आहे. अनिकेत गौतम आवटे (18) असे या तरुणाचे नाव असून त्याचे दोन साथीदार या कारवाई दरम्यान पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत.

या कारवाईत पोलिसांनी 20 लाख 76 हजार रुपये किंमतीचा 41.532 किलो ग्रॅम वजनाचा गांजाने भरलेल्या तीन बॅगा जप्त केल्या आहेत. पोलिसांनी आता पळून गेलेल्या दोघांचा शोध सुरु केला आहे.पनवेल-मुंब्रा मार्गावरुन काही तरुण रिक्षामधुन गांजा हा अमली पदार्थ विक्रीसाठी घेऊन जाणार असल्याची माहिती तळोजा पोलिसांना मिळाली होती.

सदर माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविण भगत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबु खाटपे, सहाय्यक फौजदार कंखरे, पोलीस हवालदार भोईर, डुंबरे, पोलीस नाईक करडे, पोलीस शिपाई पठाण, पवार आदींच्या पथकाने पनवेल मुंब्रा मार्गावरील धानसर टोल नाका येथे सापळा लावला होता.


यावेळी नांदेड येथून गांजा घेऊन ट्रॅव्हल्स बसने कळंबोली सर्कल येथे उतरलेले अनिकेत, इरफान आणि रईस हे तिघेही रिक्षाने भिवंडी नाका येथे जात असताना, पोलिसांनी धानसर टोलनाक्यावर त्यांची रिक्षा अडवून त्याची तपासणी सुरु केली. याचवेळी इरफान शेख आणि रईस या दोघांनी संधी साधुन रिक्षामधुन पलायन केले.

त्यामुळे पोलिसांनी अनिकेत आवटे याला ताब्यात घेऊन रिक्षामध्ये असलेल्या तीन बॅगांची तपासणी केली असता, त्यात तब्बल 20 लाख 76 हजार रुपये किंमतीचा 41.532 किलो ग्रॅम वजनाचा गांजा हा अमली पदार्थ आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी सदर गांजा जप्त करुन अनिकेत आवटे याच्याकडे त्याबाबत चौकशी केली असता, अनिकेत व इरफान शेख आणि रईस या तिघांनी नांदेड येथून ट्रॅव्हल्सने गांजा आणल्याचे तसेच भिवंडी नाका येथे सदर गांजा विक्रीसाठी घेऊन जात असल्याचे सांगितले.

त्यानंतर पोलिसांनी तिघांविरोधात एनडीपीएस ऍक्टनुसार गुन्हा दाखल करुन अनिकेतला अटक केली आहे.

# उत्क्रांतीवादाचा जनक : चार्ल्स डार्विन

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज स्मृतिदिन. १९ एप्रिल १८८२ रोजी त्यांचे निधन झाले होते. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला.त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी



आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

**-श्याम बसप्पा ठाणेदार**

www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक युवक आधार मराठी
तरुणांचा बुलंद आवाज

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

# जोगेश्वरीत श्रीराम नवमीचा साई पालखी सोहळा उत्साहात साजरा



**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर -मुंबई विभाग प्रमुख** : जोगेश्वरी ( गांधीनगर ): श्री साई सिद्धी सेवा संस्था संचालित श्री साई सिद्धी मंदिरात यंदा रामनवमी निमित्त भव्य पालखी सोहळा आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याला परिसरातील नागरिकांचा, विविध मंडळांचा आणि महिला कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग लाभला.

संध्याकाळी 5.30 वाजता मंदिरातून सुरू झालेली श्री साई पालखी परिसरातील प्रमुख मार्गांवरून फेरी मारून रात्री मंदिरात परतली. मार्गामध्ये भजन-कीर्तन, आरती, फुलांची उधळण तसेच महिलांनी रांगोळ्यांनी केलेली सजावट यामुळे वातावरण भक्तिमय झाले होते.राम मंदिर, साईकृपा मंडळ, जनता कॉलनी एकता मंडळ, इच्छापूर्ती हनुमान मंडळ, शितला देवी मंदिर, दाजी साउंड सिस्टीम, आणि इतर स्थानिक मंडळांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. भाविकांसाठी आवश्यक सुविधा करण्यात आले होते.महिला वर्गाचा सहभाग विशेष उल्लेखनीय होता. सौ. स्नेहा केळकर, सौ.अनिशा त्रिभुवन, सौ.दिपा त्रिभुवन त्यांच्या महिला सहकार्याने संपूर्ण आयोजनात उत्साहाने सहभाग घेतला. त्यांच्या वतीने महिलांसाठी विशेष सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.सुरक्षा व शिस्तबद्धतेसाठी जोगेश्वरी मेघवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संभाजी तुळशीराम जाधव साहेब, श्री. माने साहेब व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष व्यवस्था केली. त्यांच्या सहकार्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. महेंद्र मधुकर केळकर व सचिव श्री. विवेक अनंत दळवी यांनी मनःपूर्वक आभार मानले.

**या पालखी सोहळ्याच्या निमित्ताने पुढील सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते**

१) गुरुवार, १० एप्रिल २०२५ – श्री साई बाबांचे संगीतमय भजन
२) शुक्रवार, ११ एप्रिल २०२५ – श्री साई बाबांची भक्तिगीते ऑर्केस्ट्राच्या माध्यमातून
३) शनिवार, १२ एप्रिल २०२५ – लहान मुलांचा आणि महिलांचा विशेष नृत्य कार्यक्रम
४) रविवार, १३ एप्रिल २०२५ – सर्वांसाठी सांस्कृतिक स्पर्धा व रात्री १०:०० वाजता "आपला छावा" हा छत्रपती संभाजी महाराजांवर आधारित प्रेरणादायी चित्रपट दाखवण्यात आला होता.

कार्यक्रमाला स्थानिक आमदार श्री. बाळा नर साहेब, श्री. अमित पेडणेकर, श्री.प्रशांत गाडे साहेब, माजी नगरसेवक भालचंद्र अंबुरे साहेब, अँटी करप्शन कमिटी ऑफ इंडिया यांचे राष्ट्रीय सचिव श्री. देवांग शेठ तसेच मयूर बागेरिया (उत्तर मध्यम मुंबई जिल्हा उपअध्यक्ष-भाजपा ), रुपेश सिंग (समाजसेवक )डॉ. मकरंद खानोलकर सर इतर मान्यवर उपस्थित होते.तसेच जोगेश्वरी मेघवाडी पोलीस ठाण्याची उल्लेखनीय कारवाई जोगेश्वरी मेघवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संभाजी तुळशीराम जाधव, तसेच श्री. मधुकर माने, श्री. शाम पवरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी वेळेवर आणि प्रभावी कारवाई करत परिसरातील चोरीचे गुन्हे उघडकीस आणले. यामुळे अनेक नागरिकांना त्यांचा मुद्देमाल लवकर परत मिळाला.

या कार्याबद्दल नागरिक व संस्थांकडून पोलीस दलाचे कौतुक करण्यात आले. पोलिस आणि जनतेतील विश्वास वाढीस लागल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले. या कार्यगिरीच्या गौरवार्थ श्री साई सिद्धी मंदिरच्या वतीने मेघवाडी पोलीस ठाण्याचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.